देशदूत - १७-०७-२०११

बँकांच्या राष्ट्रीयीकरणाला ४२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने दैनिक देशदूत, देशदूत टाइम्स, सारस्वत यांनी शुक्रवारी क्रिकेट क्लब ऑफ इंडियाच्या सी.के. नायडू सभागृहात आयोजित केलेल्या बँकींग परिषदेत विचार मांडताना अर्थमंत्री सुनील तटकरे. त्यांच्या डावीकडे देशदूतचे व्यवस्थापकीय संपादक विक्रम सारडा, बीपीएसबीआयचे ज्येष्ठ उपाध्यक्ष अरोरा, सारस्वत बँकेचे चेअरमन एकनाथ ठाकूर, नियोजन आयोगाचे सदस्य व राष्ट्रीय सल्लागार समितीचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव, रिझर्व्ह बँकेच्या डिपार्टमेंट ऑफ बँकींग सुपरव्हीजनचे मुख्य महाव्यवस्थापक डॉ. एन. कृष्णा मोहन, मुख्य संपादक प्रकाश कुलकर्णी.

पुढारी
सोमवार, १९ जुलै २०१०
my पुणे

रुग्णालयांसाठी जादा एफएसआय

पूना हॉस्पिटलच्या रौप्यमहोत्सवी कार्यक्रमात उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते उद्योगपती रसिकलाल धारिवाल यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव, पालकमंत्री अजित पवार, आमदार गिरीश बापट, देवीचंद जैन, मुकुंददास लोहिया, राजकुमार चोरडिया.

पुणे : प्रतिनिधी

आरोग्य सेवा देण्याचे काम सरकारचे असूनही अनेक संस्था हे काम करत असल्याने त्यांना रुग्णालयांसाठी जादा एफएसआय (चटईक्षेत्र निर्देशांक) देण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी रविवारी येथे केली. खाजगी रुग्णालयांच्या अडचणी सोडविण्यासाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता असल्याचे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

पूना हॉस्पिटलच्या रौप्यमहोत्सवाच्या सांगता समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अर्थ व जलसंपदामंत्री अजित पवार, केंद्रीय नियोजन मंडळ व राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव, आमदार गिरीश बापट, आ. रमेश बागवे, संस्थेचे अध्यक्ष मुकुंददास लोहिया, व्यवस्थापकीय संचालक देवीचंद जैन, उद्योगपती रसिकलाल धारिवाल उपस्थित होते.

भुजबळ म्हणाले, हॉस्पिटल चालविणे ही सोपी गोष्ट नसून, त्यासाठी धार्मिक आणि सामाजिक भावनेतून काम करण्याची गरज असते. सर्व नागरिकांना आरोग्याच्या सुविधा देण्याचे काम हे मुख्यत्वे

पान ४ वर ▶

पान १ वरून

जादा एफएसआय...

[illegible]

राजकुमार चोरडिया यांनी प्रास्ताविक केले.

लोकसत्ता
सोमवार, १९ जुलै २०१०

पुना हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या रौप्यमहोत्सवानिमित्त काढण्यात आलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. या वेळी डावीकडून देवीचंद शहा, गिरीश बापट, अजित पवार, नरेंद्र जाधव, भुजबळ, रसिकलाल धारिवाल, राजकुमार चोरडिया.

Dated : 20/7/10

'बँक राष्ट्रीयीकरणाच्या इंदिराजींच्या निर्णयामुळेच महासत्ता बनण्याचा मार्ग मोकळा'

मुंबई, १९ जुलै/प्रतिनिधी

जवळपास ४१ वर्षांपूर्वी १९ जुलै १९६९ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी घेतलेल्या १४ बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या धाडसी आणि ऐतिहासिक निर्णयामुळेच आज भारत महासत्ता बनण्याच्या मार्गावर [illegible] आहे, अशा शब्दांत इंदिरा गांधींच्या कर्तृत्वाचे स्मरण करण्याबरोबरच, बँकांनी सर्वसमावेशक आर्थिक विकास [illegible] प्रामाणिक [illegible] न दिल्यास प्रचंड किंमत मोजून देशाचे महासत्ता बनण्याचे स्वप्न भंग पावेल, असा इशारा अनेक तज्ज्ञांनी आणि मान्यवरांनी 'देशदूत'ने येथे शुक्रवारी आयोजित केलेल्या बँकिंग परिषदेत दिला.

गेल्या चार दशकात बँकिंग क्षेत्राने पाहिलेल्या विविध स्थित्यंतरांचा वेध घेण्याबरोबरच या दशकात बँकिंग क्षेत्रासमोर असणाऱ्या विविध आव्हानांचा आढावा घेण्यासाठी या परिषदेला राष्ट्रीयीकृत, खासगी तसेच नागरी सहकारी क्षेत्रातील बँकांच्या प्रतिनिधींचा मोठा प्रतिसाद लाभला होता. या परिषदेत, सर्वच वक्त्यांनी अलीकडील जागतिक, आर्थिक संकटाच्या काळात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने बजावलेल्या महत्त्वपूर्ण कामगिरीची मुक्तकंठाने प्रशंसा केली. रिझर्व्ह बँकेच्या सावध आणि व्यावहारिक धोरणामुळेच देशाची अर्थव्यवस्था मंदीच्या कचाट्यातून फार लवकर सावरली, असे तज्ज्ञांनी सांगितले.

नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी त्यांच्या बीजभाषणात, बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा देशाच्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीवर झालेल्या परिणामांचा अभ्यासपूर्ण आढावा घेतला. राष्ट्रीयीकरणामुळे बँका सर्वसामान्यांपर्यंत पोहोचल्या असल्या तरी विकासाचा वेग कायम राखण्यासाठी भविष्यात त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे याची ग्वाही डॉ. जाधव यांनी दिली. तर सारस्वत सहकारी बँकेचे अध्यक्ष एकनाथ ठाकूर यांनी त्यांच्या प्रदीर्घ भाषणात इंदिरा गांधींच्या धोरणाचे कौतुक केले. १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले, पण देशातील सर्वसामान्यांना आर्थिक स्वातंत्र्याचे दरवाजे खुले केले ते इंदिरा गांधी यांनीच, असे ठाकूर म्हणाले. बँकिंग क्षेत्र झपाट्याने वाढत आहे; पण रिझर्व्ह बँक नागरी सहकारी बँकांना सापत्न वागणूक देत असल्याची जोरदार तक्रार ठाकूर यांनी केली. काही व्यापारी बँकांपेक्षाही मोठ्या असणाऱ्या 'सारस्वत'सारख्या नागरी सहकारी बँकेला समान संधी मिळाव्यात, अशी त्यांनी आग्रही मागणी केली.

राज्याचे अर्थमंत्री सुनील तटकरे म्हणाले, की बँकांचा पसारा प्रचंड वाढला ही समाधानाची गोष्ट आहे. बँकांची एक शाखा १४ हजारांच्या लोकसंख्येला सेवा देते, असे मानले जाते; पण या १४ हजारांपैकी प्रत्यक्षात किती गरजूंना या बँकांकडून कर्ज मिळविण्यात यश येते हे पाहिल्यास निराशाच पदरी पडते, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. राजीव गांधी आवास योजनेखाली लाभार्थ्यांना एक लाखाचे कर्ज द्या, राज्य सरकार त्या कर्जाला हमी देईल, असे आश्वासन देऊनही गरिबांच्या घरकुल योजनेला राष्ट्रीयीकृत बँका म्हणावा तसा प्रतिसाद देत नाहीत, अशी खंत तटकरे यांनी व्यक्त केली.

या प्रसंगी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या बँकिंग पुनर्रचना विभागाचे महाव्यवस्थापक डॉ. एन. कृष्ण मोहन, बँकिंग कोडस् अँड स्टँडर्डस् बोर्ड ऑफ इंडियाचे वरिष्ठ उपाध्यक्ष आर. सी. अरोरा, खासदार [illegible] राउत, बँक ठेवीदार संघटनेचे सचिव अशोक रावत, नागरी बँक असोसिएशनचे अध्यक्ष [illegible] अडसूळ, विद्या सहकारी बँकेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर, एनकेजीएसबी बँकेचे माजी अध्यक्ष पांडुरंग [illegible], इंडियन मर्चंट चेंबरचे पूर्वाध्यक्ष [illegible] यांचीही भाषणे झाली. सर्वसमावेशक आर्थिक विकासाचे तत्त्व गेली शंभर वर्षांहून अधिक काळ अंमलात आणणाऱ्या नागरी सहकारी बँकांनी आत्मविश्वासपूर्वक आव्हानांची दखल घेऊन आपल्या कार्यप्रणालीत आमूलाग्र बदल घडवावेत, असा सल्ला अनास्कर यांनी दिला.

एनकेजीएसबी बँकेचे अध्यक्ष [illegible], ज्ञानराज विठ्ठल को-ऑप. बँकेचे संचालक दिलीप [illegible], सारस्वत बँकेचे उपाध्यक्ष [illegible], बृहन्मुंबई नागरी बँक असोसिएशनचे पूर्वाध्यक्ष [illegible], अभ्युदय बँकेचे संचालक संदीप घनदाट, कपोल बँकेचे अध्यक्ष के. डी. व्होरा, सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. सुभाष भेंडे यांच्यासह मुंबईच्या नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रातील अनेक मातब्बर मंडळी या परिषदेस आवर्जून उपस्थित होती.

'देशदूत' वृत्तपत्र समूहाचे मुख्य संपादक प्रकाश कुलकर्णी यांनी प्रास्ताविक व 'देशदूत' समूहाचे व्यवस्थापकीय संचालक विक्रम सारडा यांनी उपस्थितांचे स्वागत केले. संचालक जनक सारडा यांनी पाहुण्यांचा सन्मान केला. एचडीएफसी बँकेचे वरिष्ठ उपाध्यक्ष नंदकिशोर देसाई यांचे खुसखुशीत सूत्रसंचालन उपस्थितांना भावून गेले.

शुक्रवारी बँकिंग परिषदेत एकनाथ ठाकूर, डॉ. नरेंद्र जाधव व अर्थमंत्री सुनील तटकरे.